महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्रमांक -५२५, मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२

क्रमांक:-एएमसी-२०२२/प्र.क्र.३१/पदुम-१०

दिनांक :- २६.०५.२०२३

प्रति,

१. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग,वरळी, मुंबई.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,आरे.

विषय :- आरे सरिता केंद्र वाटपासंदर्भातील नियमावलीबाबत.

संदर्भ :- शासनाचे समक्रमांकाचे दि.२९.०७.२०२२, दि.२९.०३.२०२३, दि.२६.०४.२०२३ व दि.०३.०५.२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन शासन पत्र दि. २९.०७.२०२२ अन्वये, आरे सरिता केंद्र वाटप करण्याबाबतची नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र. २६ मध्ये दि. २९.०३.२०२३ व दि. २६.०४ २०२३ अन्वये हस्तांतरणाबाबतच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तद्नंतर दि.०३.०५. २०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर नियमावलीतील नियम क्र. २.१.२.२ व २.६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव केंद्र चालविण्यास असमर्थ असल्याने रक्ताच्या नातेसंबंधात आरे केंद्र हस्तांतरण करण्याकरिताचे विनंती अर्ज विभागास प्राप्त होत आहेत. सदर बाब विचारात घेऊन दि.२४.०५.२०२३ रोजीच्या आढावा बैठकीत प्रधान सचिव (दुग्ध) यांनी आरे केंद्राच्या परवाना हस्तांतरणाच्या तरतुदीतील कलम -२६ मध्ये खालीलप्रमाणे उप कलम समाविष्ट करण्याचे निदेश दिले आहेत:-

"आरे केंद्रधारकांनी स्वतः किमान १० वर्षे स्टॉल चालविणे बंधनकारक राहील. १० वर्षांनंतर जर केंद्रधारक स्वतः केंद्र चालविण्यास असमर्थ असेल तर केंद्रधारकास सदर केंद्र, रक्ताच नातेसंबंधात हस्तांतरण करता येईल. याकरिता केंद्रधारकास रक्ताच्या नातेसंबंधातील शपथपत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक राहील. तसेच ज्या व्यक्तीस केंद्र हस्तांतरित करण्यात येणार आहे, त्या व्यक्तीने आरे केंद्र नियमावलीत वेळोवेळी केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील."

प्रस्तुत प्रकरणी तद्नुषंगिक कार्यवाही प्रधान सचिव (दुग्ध) यांच्या मान्यतेने करण्यात येईल.

सबब, शासन पत्र दि.२६.०४.२०२३ मध्ये आरे केंद्र नियमावलीतील नियम क्र. २६ मधील हस्तांतरणासंदर्भातील कलमांमध्ये उपरोक्त उप कलम समाविष्ट करण्यात येत आहे.

अ.रा.चुरी

(अ.रा.चुरी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत - प्रधान सचिव (पदुम) यांचे स्विय सहायक